# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/७५४/२०१३—१४
दिनांक :— १२ /११/२०१३

प्रति,
प्राचार्य, रासेयो अंतर्गत सर्व महाविद्यालये.

**(महत्वाचे व तातडीचे)**

सदर्भ :— १) प्रत्र क्र./४९३/२०१३—१४ दिनांक:—३१/०८/२०१३
२) No.NSS/577/2013-14 Dated: 12/09/2013
३) No.NSS/578/2013-14 Dated: 12/09/2013

विषय:— रस्ता सुरक्षा अभियान व पुरस्कार

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा अभियाना विषयी कळविण्यात आलेले आहे. सदर उपक्रमाचा आढावा घेण्यासाठी व पुढील दिशा ठरवण्यासाठी सर्व महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककांना कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. ०२ प्रमाणे आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धाचा अहवाल तयार करण्यात यावा व त्याची प्रत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये पाठविण्यात यावी.

संदर्भ पत्र क्र. ०३ प्रमाणे आपल्या महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा सर्वे आयोजित करण्यासाठी प्रश्नावली देण्यात आली होती. सदर सर्वेचे मुल्यांकन करून त्या संदर्भातील अहवाल तयार करण्यात यावा व त्याची प्रत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये पाठविण्यात यावी.

संदर्भ पत्र क्र. ०१ नुसार 'रस्ता सुरक्षा अभियाना' अंतर्गत आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा विस्तृत अहवाल/पुरस्कारसाठीचा प्रस्ताव तयार करून दिनांक ०५ डिसेंबर, २०१३ तत्पूर्वी आपल्या विभागातील रासेयो जिल्हा समन्वयकांकडे सादर करण्यात यावा. विस्तृत अहवाल व पुरस्काराविषयी प्रस्ताव तयार करताना संदर्भ पत्र क्र. ०१ सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वाचा व निकषांचा विचार करण्यात यावा.

जिल्हा स्तरावर प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव एकत्रित करून संबधित जिल्हा समन्वयक, मार्गदर्शक तत्वानुसार उत्कृष्ट ०२ महाविद्यालयाचे प्रस्ताव विद्यापीठ स्तरीय पुरस्कारासाठी शिफारस करतील. संबधीत जिल्हा समन्वयकांनी दिनांक १० डिसेंबर, २०१३ तत्पूर्वी निवडक उत्कृष्ट ०२ महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठ कार्यक्रम समन्वयकांच्या कार्यालयात पाठविण्यात यावेत.

'रस्ता सुरक्षा अभियान' अंतर्गत पुरस्काराचे प्रस्ताव पाठविताना महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा विषयक आयोजित केलेल्या सर्व उपक्रमांचे अहवाल जोडण्यात यावेत तसेच वृत्तपत्रातील कात्रणे, समर्पक छायाचित्रे, विविध प्रशस्ती पत्रे, भितीचित्रे/घोषवाक्य, निंबध इत्यादी स्पर्धाचे अहवाल, उत्कृष्ट भितीचित्राची छायाचित्रे, पथनाटय प्रदर्शन इत्यादी विषयीचे अहवाल व संदर्भ पत्र क्र. ०३ नुसार सर्वेचा अहवाल इत्यादी सर्व उपक्रमांचा उल्लेख करण्यात यावा.

'रस्ता सुरक्षा अभियान' अंतर्गत पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सादर करताना पुरस्काराचे अटी व नियम, गुण विभागणी व निकषांचा विचार करण्यात यावा.

वरील उपक्रमांस प्राधान्य देऊन त्या संदर्भातीली प्रस्ताव जिल्हा समन्वयकांकडे सादर करण्यात यावेत.

कळावे !

आपला विश्वासु,

डॉ. अतुल हं. साळुंके
प्रभारी कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग

सुचना : जिल्हा समन्वयकांनी आपल्या कक्षेतील महाविद्यालयांना 'रस्ता सुरक्षा अभियान' अंतर्गत पुरस्कार प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे व आलेल्या पुरस्करांचा संबधीत मार्गदर्शक, अटी, नियम, गुण विभागणी व निकषांच्या आधारे योग्य त्या समितीकडुन छाननी करून उत्कृष्ट ०२ प्रस्ताव दिनांक १० डिसेंबर, २०१३ तत्पूर्वी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयकांच्या कार्यालयात सादर करावे.

प्रत :— १) मा. अप्पर पोलिस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य
२) युवा अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय कार्यालय, पुणे
३) रासेयो राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन